सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

**वाचा** :-१)आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005
२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

*************************************************************************

क्र.जि.आ.व्य/कावि/ 143 /2020.
पुणे, दिनांक :- 20 /03/2020.

विषय :- कोरोनाविषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पुणे जिल्हा कार्यक्षेत्रातील **जीवनाश्यक वस्तु विषयक आस्थापना सुरु ठेवणेबाबत**

आदेश

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2(अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. आणि,

ज्याअर्थी, राज्य शासनाने संदर्भीय ४ अन्वये कोरोना विषाणूचा ( कोव्हिड १९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदींची अंमलबजावणी साठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्रधिकारी घोषित केलेले आहे.

त्याअर्थी, **मी नवल किशोर राम** जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हा पुणे, कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून पुणे जिल्ह्यामध्ये अनावश्यक गर्दी टाळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, व भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ अन्वये **सद्यस्थितीत हॉटेल, व रेस्टॉरंट मध्ये खाद्यपदार्थ विक्री करणेस बंदी आहे या आदेशाव्दारे स्पष्ट करण्यात येत आहे की, खालीलप्रमाणे जीवनाश्यक वस्तु विषयक आस्थापना सुरु राहतील.**

**१. सर्व हॉटेल/लॉज यांना तेथे वास्तव्यास असणा-या ग्राहकांना आरोग्य विषयक आवश्यक ती खबरदारी घेवुन रेस्टॉरंटमध्ये खादयपदार्थ बनवुन देण्यास परवानगी राहील.**
**२. सर्व हॉटेल/ व छोटे व्यावसायिक यांनी खाद्यपदार्थ ऑनलाईन पद्धतीने विक्री करणा-या आस्थापनांच्या मागणी नुसार पार्सल स्वरूपात काउंटरवरून वितरीत करणेत यावे.**
**३. सर्व हॉटेल/ व छोटे व्यावसायिक यांनी दुरध्वनी /भ्रमणध्वनीवरुन नागरिकांनी खादयपदार्थ मागणीबाबत संपर्क केल्यानंतर खाद्यपदार्थ होम डिलिव्हरी पार्सल स्वरूपात वितरीत करणेत यावे.**
**४. विदयार्थ्यासाठी खानावळ तसेच महाविदयालय/वस्तीगृह यामधील उपहारगृह /मेस**
**५. जीवनाश्यक वस्तु विक्री आस्थापना , दुध, किराणा दुकाने,**
**६. फळे व भाजीपाला मार्केट, फळे व भाजीपाला विक्री दुकाने**
**७. सर्व औषध उत्पादक, व विक्री आस्थापना**
**८. मटन /चिकन /मासे विक्री दुकाने**
**९. सर्व प्रकारच्या मॉल मधील जीवनाश्यक वस्तु किराणा दुकाने, दुध, फळे व भाजीपाला विक्री दुकाने**

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

जिल्हाधिकारी पुणे

**प्रत**-1. मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे 2.मा.आयुक्त पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका 3.मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी चिंचवड . पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण 4 .मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे 5. सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, पुणे 6.उपनियंत्रक वैधमापन शास्त्र, पुणे विभाग पुणे पुढिल योग्य त्या कार्यवाहीकामी.